Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# उच्च माध्यमिक स्तरावर सामाजिक बुध्दिमत्ता वृध्दीसाठी कृती कार्यक्रम

**प्रा. गायकवाड देविदास हरिभाऊ**
संशोधक विद्यार्थी
स्वामी रामानंद तीर्थ मराठावाडा विद्यापीठ नांदेड

मानव हा समाजशील प्राणी आहे. अनेक व्यक्तींचा समुह म्हणजे समाज होय. समाजामध्ये आपले स्थान निर्माण करणे, सामाजिक जीवन योग्य प्रकारे जगणे या दृष्टीने सामाजिक बुध्दिमत्तेला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. आपल्या सभोवताली आपल्याला अशा अनेक व्यक्ती दिसुन येतात. ज्या लौकिक अर्थाने व्यक्तिगत जीवनामध्ये / कार्यामध्ये यशस्वी ठरलेल्या दिसतात. परंतु समाजामध्ये एकट्या पडलेल्या आहेत. याचे कारण सामाजिक बुध्दिमत्ता कमी असणे हे आहे. सामाजिक बुध्दिमत्ता ही प्रत्येक व्यक्तीला समाजामध्ये, समाजातील विविध घटकांशी कसे वागावे याबदल दिशादर्शन करत असते. दुसऱ्या व्यक्तीच्या भावना समजून घेणे इतपतच सामाजिक बुध्दिमत्ता मर्यादित नाही तर इतर व्यक्तींच्या सभोवतालची सामाजिक परिस्थिती, सामाजिक पर्यावरण लक्षात घेऊन त्या संदर्भात व्यक्तींच्या भावना, वागणे, समजून घेण्याची क्षमता सामाजिक बुध्दिमत्तेत असते. सामाजिक बुध्दिमत्तेमुळे व्यक्तीमध्ये आंतरव्यक्तीक समस्या सोडवणे, सामाजिक प्रश्न सोडवणे, स्वत:च्या भावना ओळखणे तसेच इतरांच्या पण भावना ओळखणे, सहसंबंध विकसित करणे, सामाजिक पर्यावरणामध्ये योग्य पध्दतीने वागणे यासारखे गुण विकसित होते.

व्यक्तीला समाजात राहत असतांना प्रत्येक व्यक्तीमध्ये सामाजिक चातुर्य असणे आवश्यक आहे. कारण सामाजिक चातुर्य व्यक्तीला इतर व्यक्तीशी विविध परिस्थितीत, लोकांचे स्वभाव, भावना, आपेक्षा ओळखून, इतरांचे मन न दुखवता, हुशारीने, सभ्यतेने व परिणामकारक रितीने वागण्याची क्षमता निर्माण करते. सामाजिक बुध्दिमत्ता ही गणिती बुध्दिमत्तेपेक्षा अधिक महत्वाची आहे. कारण त्यामुळे आपण व्यक्ती म्हणुन कसे आहोत याची ओळख होते. समाजामध्ये वेगवेगळे घटक, वेगवेगळे समूह समाविष्ट असतात. या सर्व समूहातील व्यक्तीमध्ये भिन्न-भिन्न विचार, आचार दिसून येतात. त्यात विरोधाभासही असतो. त्यासाठी उच्च सामाजिक बुध्दिमत्ता असणाऱ्या व्यक्तींनी विशेष प्रयत्न करावे लागतात. याच बरोबर व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक जीवनामध्ये आपला अनेकांशी संबंध येत असतो. त्या सर्वांशी योग्य प्रकारे संवाद साधून कार्य पुर्तता करता येणे आवश्यक असते. त्यासाठी सामाजिक बुध्दिमत्तेची गरज असते. कोणत्याही देशाच्या राज्याच्या, समाजाच्या प्रगतीसाठी निकोप समाजजीवनाची आवश्यकता असते व असे समाजजीवन उच्च सामाजिक बुध्दिमत्ता असणाऱ्या व्यक्ती निर्माण करु शकतात. सामाजिक बुध्दिमत्ता अयोग्य पध्दतीने तिचा वापर झाला तर ती समाज, व्यक्ती, कुटुंब, राज्य, राष्ट्रासाठी अपायकारक आहे. अनेक वेळा आपल्याला समाजामध्ये दंगे, जाळपोळ, भांडणे, वैरभाव, फसवणूक, ऑनलाईन लुट, शोषण, बदनामी, गैरवापर, समाज मन दुखावणे, व्यक्ती-व्यक्ती मध्ये भेद या सारखे गुन्हे घडतांना दिसतात.

कमी सामाजिक बुध्दिमत्ता असणारी व्यक्ती आपणास अनेक क्षेत्रांमध्ये उदा. राजकारण, समाजकारण, व्यवसाय, नौकरीचे ठिकाण, कामाचे ठिकाण, क्रीडा क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र इ. कोणत्याही क्षेत्रामध्ये आपल्या स्वत:चया फायद्यासाठी समाजाला वेठीस धरुण आपल्या स्वार्थासाठी अयोग्य कृती करण्यास भाग पाडतात. याचे कारण सामान्य व्यक्तीचे विचार 'आपण बरे व आपले बरे' हा अयोग्य विचार भारतासारख्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक, सांस्कृतिक विविधता आढळून येते. समाजामध्ये वेगवेगळे गट निर्माण झालेले दिसतात. प्रत्येक गटाचे विचार, आचार, मान्यता, आदर्श, चालीरिती, ध्येय, परंपरा,

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

उद्दिष्ट भिन्न-भिन्न दिसून येतात. आपलाच येजेंडा श्रेष्ठा अशी अहंकाराची भावना निर्माण करुन समाजा-समाजामध्ये, वेगवेगळ्या गटामध्ये तेढ निर्माण केली जाते.

सामाजिक बुध्दिमत्ता विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांत वेळीच सामाजिक बुध्दिमत्ता वाढवणे आवश्यक आहे. योग्य वयात चांगले गुण निर्माण केल्यास योग्य नागरिक तयार होण्यास मदत होते. हेच नागरिक देशाचे भवितव्य ठरवत असतात. विद्यार्थ्यांच्या सामाजिक समायोजनासाठी, नेतृत्व, सहकार्य, संवाद व निर्णयक्षमता विकासासाठी आवश्यक असलेली जीवनकौशल्ये शिकण्यासाठी आवश्यक आहे. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बुध्दिमत्ता वृध्दीसाठी काही निश्चित कृती कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. या सारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मजाणीव, भावनिक जागरुकता, सहानुभुती, सहकार्य, सामाजिक समायोजन वाढविणे, प्रभावी संवाद कौशल्य, सामाजिक चातुर्य, विनोद बुध्दी, संवेदनशीलपणा, सहानुभुती, सामाजिक जाणीव, सामाजिक समस्या सोडविण्याची क्षमता, नेतृत्व व निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांमध्ये वाढती सामाजिक असंवेदनशीलता, प्रभावी संवाद कौशल्याच्या अभाव, सहकार्य व सहानुभुती कमी होणे, संघर्ष व आक्रमक वर्तन, निर्णय क्षमतेतील अस्थिरता यातुन कृती कार्यक्रमाची गरज दिसुन येते.

**उच्च माध्यमिक स्तरावर सामाजिक बुध्दिमत्ता वृध्दीसाठी पुढीलप्रमाणे कृतीकार्यक्रम राबवता येईल.**

**कार्यक्रमाची ओळख व सामाजिक बुध्दिमत्ता संकल्पना स्पष्ट करणे :-** यामध्ये सर्वात प्रथम विद्यार्थ्यांना कार्यक्रमाची ओळख करुन दिली जाते. आजच्या स्पर्धात्मक व बदलत्या सामाजिक परिस्थितीत विद्यार्थ्यांना विविध सामाजिक भूमिका पार पाडतात. जे मित्र, सहकारी, नेता, अनुयायी, जबाबदारी नागरिक इ. भूमिका यशस्वीरित्या पारपाडण्यासाठी सामाजिक बुध्दिमत्ता अत्यंत महत्त्वाची ठरते. भावनिक अस्थिरता, समवयीन दबाव, संवादातील अडचण, निणर्यक्षमतेत अडचण, समायोजनाचा अभाव, संघर्ष, गैरसमज, नकारात्मकवर्तन, विचार सामाजिक बुध्दिमत्ता कमी दिसुन येते. म्हणुन सामाजिक बुध्दिमत्ता वृध्दिसाठी कृती कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. **सामाजिक बुध्दिमत्ता :-** व्यक्तीची स्वत:चया व इतरांच्या भावना, विचार, हेतु व वर्तन समजून घेऊन योग्य सामाजिक प्रतिसाद देण्याची क्षमता होय. सामाजिक परिस्थिती समजून घेऊन योग्य वर्तन करण्याची क्षमता होय.

**आत्मजाणीव (Self Awareness) :-** सामाजिक बुध्दिमत्तेचा पाया आत्मजाणीव आहे. जोपर्यंत व्यक्तीला स्वत:च्या भावना, प्रतिक्रिया व वर्तनाची जाणीव नसते. तोपर्यंत ती इतरांशी प्रभावीत सकारात्मक संवाद साधू शकत नाही. आत्मजाणीव म्हणजे व्यक्तीला स्वत:च्या भावना, विचार, मुल्ये, क्षमता, मर्यादा, वर्तन व सामाजिक भूमिकांची जाणीव असणे होय. व्यक्ती स्वत:ला कसे पाहते, इतरांशी कसे वागते आणि तिच्या वर्तनाचा इतरांवर कसा परिणाम होतो याची जाणीव होय. आत्मजाणीव झाल्यास विद्यार्थ्यांमध्ये स्वत:च्या भावना नियंत्रित ठेवणे, इतरांच्या भावना समजून घेणे, सामाजिक परिस्थितीत योग्य प्रतिसाद देणे, संघर्ष टाळणे, योग्य निर्णय घेणे यासारखे कौशल्य निर्माण होतात. ताण-तणाव कमी होता. स्वत:च्या शक्ती क्षमता व कमकुवत बाजू / मर्यादा लक्षात येते. यातुन सामाजिक बुध्दिमत्ता अधिक चांगल्या पध्दतीने विकसित होण्यास मदत होते.

**भावनिक जागरुकता (Emotional Awareness) :-** भावनिक जागरुकता ही विद्यार्थ्यांच्या सामाजिक, भावनिक, शैक्षणिक विकासाची गुरुकिल्ली आहे. भावनिक जागरुकता ही सामाजिक बुध्दिमत्तेची आधारभूत घटक आहे. भावना समजल्याशिवाय सामाजिक वर्तन योग्य पध्दतीने घडू शकत नाही. भावनिक जागरुकता सामाजिक संवेदन व संवाद कौशल्य वाढवते. भावनांचे जाणीव, समज, नियंत्रण महत्वाचे असते. भावनिक जागरुकतामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मनियंत्रण क्षमता, सामाजिक समायोजन, सुलभ होणे, तणाव व संघर्ष कमी होणे, शैक्षणिकवर्तनात सकारात्मक बदल या सारखे कौशल्य तयार होतात. चर्चतून ओळख, उपक्रम, अनुभव कथन, समूह चर्चा, भावनिक प्रसंग विश्लेषण यातून भावविश्व विकसित होऊन

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

मानसिक आरोग्य उच्च पातळीचे निर्माण होते. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी भावनिक जागरुकता अतिशय महत्वाचे आहे. योग्य मार्गदर्शनात योग्य पध्दतीने भाव जागरुक होते.

**भावनांचे नियमन (Emotional Regulation) :-** भावनांचे नियमन ही भावनिक जागरुकतेनंतरची पुढची व अधिक प्रगत पायरी आहे. उच्च माध्यमिक स्तरावर भावनांचे नियमन विकसित केल्यास विद्यार्थ्यांचा सामाजिक व शैक्षणिक विकास अधिक सुसंगत व संतुलित होतो. भावनांची जाणीव पुरेशी नसून त्या भावनांचे योग्य वेळी, योग्य प्रकारे नियमन करणे आवश्यक असते. भावनांचे नियमन ही भावनिक व सामाजिक बुध्दिमत्ता यांची कार्यात्मक बाजू आहे. भावनिक नियमनात भावनांची तीव्रता, कालावधी व अभिव्यक्ती परिस्थितीनुसार नियंत्रित करणे हे कौशल्य विकसित होते. ही सतत चालणारी, जाणीवपुर्वक व अ-जाणीवपुर्वक प्रक्रिया आहे.

**सहानुभुती विकास (Empathy) :-** सहानुभुती विकास हा सामाजिक बुध्दिमत्तेचा केंद्र बिंदू असून उच्च माध्यमिक स्तरावर त्याचा विकास केल्यास विद्यार्थी सामाजिक दृष्ट्या संवेदनशील, समंजस व जबाबदार नागरिक बनतात. मानवी सामाजिक वर्तनाचा पाया सहानुभुतीवर आधारित असतो. इतरांच्या भावना, विचार, अनुभव समजून घेणे व त्यांच्याशी भावनिक दृष्ट्या जोडले जाणे ही सहानूभूतीची मुख्य वैशिष्ट्ये आहे. स्वत:च्या भावनांपासून स्वतंत्र राहून इतरांच्या भावनांचे आकलन व त्या भावनांशी समंजस प्रतिसाद देण्याची क्षमता होय. यातून विद्यार्थ्यांमध्ये आक्रमक्ता व संघर्ष कमी होते. या बरोबर संवाद कौशल्य व नेतृत्व गुण विकसित होतो. जबाबदार विद्यार्थ्यांसाठी सहानुभुती विकास आवश्यक आहे.

**सामाजिक समायोजन :-** सामाजिक समायोजन ही विद्यार्थ्यांच्या सामाजिक यशाची कसोटी आहे. उच्च माध्यमिक स्तरावर भावनिक व सामाजिक घटकांच्या एकत्रित विकासातुन सामाजिक समायोजन प्रभावीपणे साध्य करता येते. मानवी जीवन हे सामाजिक परस्परसंबंधावर असते. स्वत:च्या गरजा व समाजाच्या अपेक्षा यांमध्ये संतुलन राखणे या कौशल्याचा विकास यात होतो. ही सतत चालणारी प्रक्रिया परिस्थितीनुसार बदलणारी आहे. वैयक्तिक व सामाजिक घटकांवर अवलंबून आहे. विद्यार्थ्यांमध्ये हे कौशल्य विकसित झाल्यास सामाजिक एकाकीपणा कमी होतो, आत्मविश्वास व आत्मसन्मान वाढतो, शैक्षणिक कार्यक्षमता सुधारते, भावनिक अस्थिरता कमी होते. योग्य सामाजिक समायोजन झाल्यास योग्य सामाजिक वातावरण निर्मिती होऊन सामाजिक गतिशीलता वाढते.

**प्रभावी संवाद कौशल्य :-** प्रभावी संवाद कौशल्य हे सामाजिक बुध्दिमत्तेचे कार्यशील रुप असून भावनिक जागरुकता, नियमत व सहानुभूती यांच्या एकत्रित विकासातुन ते अधिक सक्षमपणे विकसित होते. मानवी सामाजिक व्यवहारांचा पाया संवादावर आधारित आहे. विचार, भावना, अनुभव व अपेक्षा इतरांपर्यंत योग्य पध्दतीने पोहोचविण्याची क्षमता होय. उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी संवाद कौशल्य आवश्यक आहे. स्पष्ट, योग्य, सुसंगत व सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह पध्दतीने पाठविणे व ग्रहण करणे गरजेचे असते. यातून सामाजिक स्वीकारता वाढते, आत्मविश्वास व आत्मसन्मान वृध्दिंगत होणे, सामाजिक संघर्ष कमी होतो, नेतृत्व गुण विकसित होते. समाजामध्ये राहत असतांना प्रभावी संवाद कौशल्य व्यक्ती विकासाला चालना देते. आपले विचार, भावना, मत, अभिव्यक्ती योग्य पध्दतीने समोरचया पर्यंत पोहचता येतो. व्यक्ती जवळ येतात, विचारांची देवाण-घेवाण वाढते.

**अशाब्दिक संवाद :-** अशाब्दिक संवाद हा प्रभावी संवादाचा आत्मा असून तो सामाजिक बुध्दिमत्ता व भावनिक समायोजनाचा महत्वाचा दुवा आहे. उच्च माध्यमिक स्तरावर अशाब्दिक संवाद कौशल्य विकसित केल्यास विद्यार्थ्यांचे सामाजिक व्यवहार अधिक सुसंवादी, संवेदनशील व परिणामकारक बनतात. मानवी संवाद हा केवळ शब्दांपुरता मर्यादित नसुन मोठ्या प्रमाणावर अशाब्दिक संकेतांवर आधारित असतो. हावभाव, चेहऱ्यावरील भाव, देहबोली, नेत्रसंपर्क, आवाजातील चढ-उतार इत्यादी माध्यमांतून व्यक्त होणारा संवाद म्हणजे अशाब्दिक संवाद होय. भावना अचूकपणे व्यक्त होतात, सामाजिक

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

गैरसमज कमी होतात, आत्मविश्वास व सामाजिक स्वीकार वाढतो, प्रभावी संवाद कौशल्य वृध्दिंगत होतो. शाब्दिक संवादाबरोबर अशाब्दिक संवादपण तेवढाच महत्वाचा आहे.

**सहकार्य व टीमवर्क :-** सहकार्य व टीमवर्क ही सामाजिक बुध्दिमत्तेची कार्यशील अभिव्यक्ती असून उच्च माध्यमिक स्तरावर त्यांचा विकास केल्यास विद्यार्थी सामाजिकदृष्ट्या सक्षम, जबाबदार व सहयोगी नागरिक बनतो आधूनिक समाजात यशस्वी सामाजिक व व्यावसायिक जीवनासाठी सहकार्य व टीमवर्क ही मूलभूत कौशल्ये आहे. शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थी केवळ वैयक्तिक स्पर्धेत नव्हे तर गटांमध्ये कार्य करुन सामाजिक कौशल्य आत्मसात करतात. सहकार्य व टीमवर्क विकसित झाल्यास सामाजिक समायोजन अधिक प्रभावीपणे विकसित होते. सामाजिक समायोजन सुधारते, नेतृत्व गुण व जबाबदारीची भावना वाढते, सहानुभूती व परस्पर आदर विकसित होते, शैक्षणिक कार्यक्षमता सुधारते या सारख्या गुणांचा यात विकास होतो. सहकार्य व टीमवर्क यातून विद्यार्थी जवळ येतात. एक दुसऱ्याला जवळून ओळखतात. निर्णयक्षमता, नेतृत्व गुण, पुढाकार वृत्ती, संघर्ष निवारण, सुसंवाद वाढीस लागतो.

**नेतृत्व कौशल्य :-** नेतृत्व कौशल्य ही सामाजिक बुध्दिमत्तेची परिपक्व अभिव्यक्ती आहे. समाजाच्या सर्व क्षेत्रांत नेतृत्व कौशल्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. नेतृत्व कौशल्यांचा विकास झाल्यास विद्यार्थी सामाजिकदृष्ट्या जबाबदार, निर्णयक्षमत व प्रभावी नागरिक बनतात. या कौशल्यात विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता, संवाद कौशल्य, जबाबदारी स्वीकारणे, समस्या निराकरण क्षमता, संघप्रेरणा, नैतिक मुल्ये वाढीस लागतात. शैक्षणिक स्तरावर पुढाकार घेणे, इतरांचे नेतृत्व करणे या सारख्या गुणांतुन व्यक्ती आपली छाप इतर व्यक्तीवर पाडत असते. जीवन जगतांना विद्यार्थ्यांना पुढाकार घेणे या कौशल्यातुन शक्य होते. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे, सामाजिक बुध्दिमत्ता उच्च पातळीवर जाण्यासाठी आवश्यक आहे.

**संघर्ष निवारण :-** आजच्या सामाजिक व शैक्षणिक वातावरणात विविध प्रकारच्या संघर्षांना समोरे जावे लागते. सहाध्यायी, शिक्षक, कुटुंब, समाज यांच्याशी होणारे मतभेद विद्यार्थ्यांच्या भावनिक व सामाजिक विकासावर परिणाम करतात. संघर्ष निवारण्यासाठी प्रभावी संवाद, तर्कसंगत विचार-निर्णय, सहानुभुती, सक्रिय ऐकणे, राग नियंत्रण, समायोजन व तडजोड, परिस्थितीनुसार प्रतिसाद या सारख्या कौशल्यातून विद्यार्थी संघर्ष निवारण करु शकतो. यातुन विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, समायोजन, सकारात्मक सामाजिक वर्तन, चातुर्य, विनोदबुध्दी, लवचिकता, अंर्तदृष्टी अभ्यास वाढलेले दिसते. आजच्या काळात किशोर वयातील मुलांमध्ये संघर्षाची मनोवृत्ती वाढलेली दिसते. त्यामुळे आज या कौशल्याची अत्यंत आवश्यकता आहे. हे कौशल्य जीवनभर उपयोगी पडणारे आहे. सर्व क्षेत्रात याची उपयुक्तता आहे.

**सामाजिक समस्या ओळख :-** उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समस्याची ओळख होणे गरजेचे आहे. आपण ज्या सामाजिक वातावरणात राहतो. तेथील जटील समस्या माहित असणे आवश्यक आहे. आज शैक्षणिक स्तरावरपण व्यसनाधिनता, डिजीटल गैरवापर, डिजिटल फसवणुक शोषण, सहकारी विद्यार्थ्यांशी मतभेद, शिक्षक, मुख्याध्यापक, कर्मचारी वर्गाशी मतभेद प्रत्येक पायरीवर दिसुन येत आहे. त्याचा परिणाम उपस्थितीवर होत आहे. मुलींना शिक्षण घेणे अवघड झाले आहे. हुशार मुलांना पोषक वातावरण मिळत नाही. वेळ प्रसंगी पोलीसांची मदत घ्यावी लागते. शिक्षक-मुख्याध्यापकाकडुन मुली व शिक्षिकांचे शोषण वाढत आहे, स्त्रीभ्रुण हत्या, हुंडाबळी, लैंगिक शोषण, अपहरण यासारख्या समस्याची कीड शैक्षणिक विभागाला लागली आहे. निवारणासाठी सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. चांगले गुण फक्त सांगून, बोलून नाहितर प्रत्यक्ष आचरणात आणणे गरजेचे आहे. तर परिवर्तन होईल नाही तर नाही.

**सामाजिक निर्णयक्षमता :-** यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक परिस्थितीनुसार उपलब्ध पर्यायांचा विचार करुन, मुल्याधिष्ठित, विवेकी व समाजहितकारी निर्णय घेण्याची क्षमता विकसित केली जाते. विद्यार्थ्यांना निर्णय घेतांना होणारी दुविधा मनस्थितीतुन तर्कसंगत निर्णय घेण्याची क्षमता विकसित केली जाते. निर्णय घेतांना नैतिक विवेक, स्वत:वर नियंत्रण, परिणामांची

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

जाणीव, पर्यायांचा विचार, मुल्यपुरक विचार लक्षात घेण्याची क्षमता विकसित केली जाते. ज्यातून विद्यार्थी योग्य समाजहित लक्षात घेवून निर्णय घेवू शकतात.

**सामाजिक कौशल्य :-** उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी हा किशोरवयीन असल्याने त्याच्यात सामाजिक कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. या कौशल्यात विद्यार्थ्यांमध्ये इतरांसोबत काम करणे, प्रभावी संवाद साधणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे, सहकार्य व संघभावना, इतरांचे मत स्विकारणे हे गुण विकसित केले जाते. समाजातील प्रत्येक घटकाबरोबर मिसळणे, एकरुप होणे, विचार, मतांची देवाण-घेवाण यांचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले जाते. सामाजिक कौशल्यातुन विद्यार्थ्यांना पटवून दिले जाते. सामाजिक कौशल्यातून विद्यार्थ्यांमध्ये समाजा उपयोगी कृतीपर उपक्रम राबवले जाते. त्यातून विद्यार्थी समाजात सहज एकरुप होण्यास शिकतो. यातुन सामाजिक गतिशीलता वाढते.

**सामाजिक जबाबदारी :-** आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाला देणे लागतो याची आठवण करुन देणारा घटक म्हणजे सामाजिक जबाबदारी होय. सध्या नैतिकता खुपच खालच्या पातळीवर गेली आहे. ती का खाली गेली व आपण तिला कसे वर आणू शकतो यावर सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी चर्चा करुन उपाय अचरणात आणावे. मी माझे घर, परिसर स्वच्छ ठेवतो तसे समाजातील प्रत्येक क्षेत्रात पण मी स्वच्छ वर्तन, विचार, आचार ठेवणे म्हणजे सामाजिक जबाबदारीची जाणीव होय. यातुन उत्तम नागरिक तयार होईल व सामाजिक समस्या कमी निर्माण होती.

**जीवन कौशल्य :-** विद्यार्थ्यांनी जीवन जगतांना कोणते गुण अंगीकारावे हे या कौशल्यात शिकवले जाते. यात सर्जनशील विचार, प्रभावी संवाद, आंतरवैयक्तिक संबंध, आत्मजाणीव, ताण, भावना, राग, व्यवस्थापन, योग अभ्यास, नैतिक मुल्यावर भर यासारखे गुण विकसित केले जाते. त्यातुन योग्य जीवनशैली विकसित होवून उच्च सामाजिक बुध्दिमत्ता वाढीस लागते. आज याची प्रत्येक विद्यार्थी, व्यक्तींना गरज आहे. आहार-विहार, निरोगी झोप समजावून मानसिक आरोग्य वाढविले जाते. वेळेचे व्यवस्थापन, तर्कसंगत विचार, समता, मानसिक सद्दढता (वेळेचे महत्व) समजुन सांगितले जाते.

**पुनरावलोकन :-** सामाजिक बुध्दिमत्ता वृध्दिसाठी जो कृती कार्यक्रम आयोजित केला त्यातील प्रत्येक कौशल्याचे मानवी जीवनातील, समजिक स्तरावरील महत्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले जाते. प्रत्येक कौशल्य हे सामाजिक पातळीवर उपयुक्त आहे. प्रत्येक कौशल्य उत्तम समजून घेऊन आचरणात आणल्यास उच्च माध्यमिक स्तरावर सामाजिक बुध्दिमत्ता नक्की वाढीस लागते व त्याचा परिणाम व्यक्तिगत जीवनाबरोबर सामाजिक जीवनावर निश्चित दिसुन येतो.

**अभिप्राय व समारोप :-** जो कृती कार्यक्रम आपण राबवतो त्याच्या विषयी विद्यार्थ्यांचे मनोगत जाणून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त कृती कार्यक्रम राबवल्यास प्रतिसाद चांगला असतो. प्रतिसादानुसार कार्यक्रमात लवचिकता आणता येते, बदल करता येतो. शेवटी कार्यक्रमाचा समारोप करुन परिणामकारकता पाहता येईल.

**शैक्षणिक उपयुक्तता :-** सामाजिक बुध्दिमत्ता वृध्दीसाठी जो कृती कार्यक्रम राबवला जातो. तो निश्चित विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक्रम विकासासाठी, शालेय प्रशासनासाठी, शैक्षणिक धोरण, समुपदेशनासाठी उपयोगी आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जीवन विकासासाठी उपयुक्त आहे. सामाजिक स्तरावर इतरांच्या भाव विश्वाबरोबर योग्य व्यवस्थापन निर्माण करता येते. त्यातुन उच्च पोषक सामाजिक वातावरण निर्माण होते. शैक्षणिक क्षेत्राबरोबर विद्यार्थी कार्यक्षमपणे समाजाबरोबर जोडला जातो. समाज उपयोगी सर्व गुण विद्यार्थ्यात निर्माण होतात. जे सामाजिक बुध्दिमत्ता वाढीस लावते.

**सारांश :-** कृती कार्यक्रम हा अनुभवाधारित व सहभागात्मक असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सामाजिक परिस्थितीत वर्तन शिकण्याची संधी मिळते. भूमिकानाट्य गटचर्चा, खेळ, जीवन कौशल्य, प्रभावी संवाद कौशल्य, संवेदनशीलपणा, सामाजिक जाणीव, चातुर्य, विनोदबुध्दी, नेतृत्व क्षमता, निर्णय क्षमता, सकारात्मक विचार, लवचिकता यासारखे गुण विकसित होते. कृती

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांमध्ये स्थैर्य, आत्मविश्वास, सामाजिक समायोजन, जबाबदार नागरिक, स्वतःच्या व इतरांच्या भावना ओळख, प्रभावी ऐकणे व बोलणे, गटात काम करण्याची क्षमता, मतभेद शांततेने सोडवणे, योग्य निर्णय घेणे, स्थित बुध्दि या सारखे क्षमता, कौशल्य विकसित होतात. गट चर्चा, भूमिकानाट्य समाजसेवा उपक्रम, सहकारी अध्ययन, वादविवाद व चर्चासत्र, शालेय उपक्रम, यातुन सामाजिक बुध्दिमत्ता विकसीत होते. सामाजिक बुध्दिमत्ता विकासासाठी वरील उपक्रम निश्चित उपयोगी आहे. शालेय जीवनात योग्य वेळी योग्य गुण, कौशल्य विकसित केल्यास योग्य नागरिक तयार होतील. त्यातून व्यक्ती जीवन, कुटुंब, समाज, राज्य, राष्ट्राचा सर्वांगीण विकास होतो. आज NEP 2020 नुसार सामाजिक बुध्दिमत्ता विकसित करणे गरजेचे आहे. यातुन शैक्षणिक उद्दिष्टापर्यंत जाता येईल.

## संदर्भग्रंथ :-

पारसनीस, न.रा. प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, नुतन प्रकाशन 1990.

निष्ट आभारानी, प्रगत शैक्षणिक मनोविज्ञान, विनोद प्रकाशन, 1985 प्रकरणे 7-8.

जगताप ह.ना., अध्ययन-उपपत्ती व अध्ययन, पुणे, नुतन प्रकाशन, 1992 प्रकरण 4.

कुडल म.बा., शैक्षणिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, 2011.

ॲडम कपूर, जसीका कपूर- द सोशल सायन्स रोटे लेज लंडन-1985.

साळुंखे, सर्जेराव, समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, पुणे, 2003.

अरविंद व देशपांडे, प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर-2010.

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985